दैनिक दिव्य मराठी

03-Aug-2021
भुसावळ Page 2

# परीक्षेचा तणाव घेऊ नका, त्याचा उत्सव साजरा करा

डॉ. अमोल जावळे यांचे ऑनलाइन मार्गदर्शन

**प्रतिनिधी** | यावल

परीक्षा काळात ताणतणाव दूर करण्यासाठी विचारांचा योग्य दृष्टिकोन महत्त्वाचा असतो. परीक्षा हा एक उत्सव आहे अशी विद्यार्थ्यांची भूमिका असावी. ताणतणावाचे व्यवस्थापन केल्यास प्रत्येक व्यक्ती टॉपर होऊ शकते, असे विचार ऑनलाइन समुपदेशन कार्यशाळेत मानसोपचार तज्ञ डॉ.अमोल जावळे यांनी व्यक्त केले.

'ऑनलाइन परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून पाचोरा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वासुदेव वले उपस्थित होते. तर अध्यक्षस्थान डॉ. संध्या सोनवणे यांनी भूषवले. समुपदेशन समिती व आय. क्यु. ए. सी. विभागातर्फे हा कार्यक्रम घेण्यात आला. उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार यांनी प्रस्तावना केली. पुढे बोलताना डॉ.जावळे म्हणाले की कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रात काही अनुकूल व प्रतिकूल परिणाम घडले आहेत. काळाची गरज म्हणून ऑनलाइन शिक्षण व परीक्षा भविष्याची नांदीच आहे असे आपणास म्हणता येईल. तणाव निवारण कसे करावे याची काही महत्त्वाची सूत्रे त्यांनी सांगितली. सूत्रसंचालन डॉ. सुधा खराटे यांनी केले, आभार प्रा. एस. आर. गायकवाड यांनी मानले. कार्यशाळेत एकूण ५७ विद्यार्थ्यांनं सहभाग नोंदवला. उपप्राचार्य प्रा. अर्जुन पाटील, डॉ. पी. व्ही. पावरा, डॉ. एस. पी. कापडे, प्रा. आर. डी. पवार, डॉ. एच. जी. भंगाळे व मिलिंद बोरगडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

## पीआरएन, पासवर्ड अचूक टाकावा

संगणक विभागाचे प्रमुख व ऑनलाइन परीक्षा समन्वयक प्रा. ईश्वर पाटील यांनी 'ऑनलाइन परीक्षेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी' या विषयावर मार्गदर्शन केले. दिलेल्या कोडनुसार लॉगिन करणे, मोबाईल, टॅब, लॅपटॉप, इंटरनेट अपडेट ठेवणे, पीआरएन व पासवर्ड अचूक टाकणे, कॅमेऱ्याची व्यवस्थित सेटिंग करणे हे ऑनलाइन परीक्षेत खूप महत्त्वाचे असते, असे त्यांनी सांगितले.